आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र -  रात्री ८.०५ वाजता
१४ मे २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपली, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा वाराणसीतून अर्ज दाखल

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची उद्या नाशिक आणि कल्याणमध्ये प्रचारसभा, मुंबईत रोड शो

- दिल्लीतल्या कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी ईडी आम आदमी पक्षालाही आरोपी करणार

- कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचे कर्मचारी असल्याचं भासवून खंडणी वसूल करणाऱ्यांपासून सावध राहण्याचा केंद्रीय गृहमंत्रालयाचा इशारा

**आणि**

- फ्रान्समध्ये आजपासून ७७ व्या कान्स चित्रपट महोत्सवाला सुरुवात, पहिल्यांदाच भारत पर्वाचं आयोजन

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची मुदत आज संपली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी लोकसभा मतदारसंघातून भाजपा उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

देशात जर काँग्रेस सरकारसारखं कमकुवत सरकार सत्तेत असले तर ते देशालाही कमकुवत बनवेल, अशी टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. ते आज झारखंडमधल्या कोडर्मा इथं एका प्रचार सभेत बोलत होते. काँग्रेसच्या दुर्बलतेमुळेच देशात नक्षलवादाला खतपाणी मिळालं, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

देशांतर्गत सकल उत्पादन दर युती सरकारपेक्षा आघाडी सरकारच्या काळात जास्त होता असं काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी म्हटलं आहे. निर्मला सीतारामन यांनी काल काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर टीका केली होती. काँग्रेसचा न्यायपत्रिका जाहीरनामा व्यवहार्य नसल्याचं त्यानी म्हटलं होतं. या टीकेला उत्तर देताना जयराम रमेश यांनी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या कार्यकाळात रोजगार निर्मितीचा दर मोदी सरकारपेक्षा जास्त होता असा दावा केला आहे. आघाडी सरकारचा कार्यकाळ संपताना वित्तीय तूट आणि देशावरचं कर्ज मोदी सरकारच्या कार्यकाळाहून कमी होतं असं सांगत रमेश यांनी बेरोजगारी आणि महागाईबद्दल भाजपा सरकारवर टीका केली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नाशिकमध्ये सभा घेणार आहेत. दुपारी एक वाजता निफाड तालुक्यातल्या पिंपळगाव बसवंत इथं मोदी यांची सभा होईल. त्यानंतर कल्याणमध्ये प्रधानमंत्री सभेला संबोधित करतील. संध्याकाळी मुंबईत ते रोड शो करणार आहेत.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सभादेखील नाशिकमध्ये उद्या होणार आहेत.

**<><><><><>**

नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात २०२६ नंतर देशात महिलाराज येईल असं मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. पालघर जिल्ह्यात डहाणूमध्ये महायुतीच्या कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. महायुती ही विकासाची ट्रेन आहे, आणि या विकासाच्या ट्रेनला मोदीजींचं भक्कम इंजिन आहे. सगळ्यांना सोबत घेवून मोदीजींची विकासाची ट्रेन सबका साथ सबका विकास म्हणत पुढे जाईल, असं ते म्हणाले. मात्र दुसरीकडे अवस्था बिकट आहे तिकडे तर फक्त इंजिनचं आहेत. ज्यांना डबे नाहीत, असा आरोप त्यांनी केला. शिटीला आम्ही वसईपर्यंतच सीमित ठेवू तिला डहाणूपर्यंत येवू देणार नाही, असं ते बहुजन विकास आघाडीला उद्देशून म्हणाले.

<><><><>

आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून दाखल झालेल्या ९० टक्क्यांपेक्षा जास्त तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून काँग्रेस आणि भाजपा वगळता इतर राजकीय पक्षांची कोणतीही मोठी तक्रार प्रलंबित नसल्याचं निवडणूक आयोगानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून सव्वा चारशे मोठ्या तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यापैकी ४०० प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. काँग्रेसने १७०, तर भाजपने ९५ आणि इतर पक्षांनी १६० तक्रारी दाखल केल्याचं यात म्हटलं आहे. आदर्श आचारसंहितेचं उल्लंघन केल्या प्रकरणी काँग्रेस आणि भाजपानं एकमेकांविरोधात दाखल केलेल्या काही तक्रारी प्रलंबित असल्याचं आयोगानं म्हटलं आहे.

<><><><>

विधान परिषदेच्या चार जागांसाठी पुढच्या महिन्यात होणारी निवडणूक, केंद्रीय निवडणूक आयोगानं पुढे ढकलली आहे. शाळांच्या उन्हाळी सुट्ट्या

संपल्यावर ही निवडणूक घ्यावी, असं निवेदन निवडणूक आयोगाला मिळालं होतं. त्यानंतर आयोगानं ही घोषणा केली आहे.

<><><><><>

दिल्लीतल्या कथित मद्य धोरण घोटाळ्यात आम आदमी पक्षाला आरोपी केलं जाईल, असं ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने आज सर्वोच्च न्यायालयात सांगितलं. दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या जामीन प्रकरणी न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीवेळी ईडीने ही माहिती दिली. या प्रकरणात लवकरच पुरवणी आरोपपत्र दाखल केलं जाईल, अशी माहितीही ईडीने न्यायमूर्ती स्वर्णकांत शर्मा यांना दिली.  दरम्यान, भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के. कविता यांच्या न्यायालयीन कोठडीत २० मे पर्यंत वाढ करण्यात आली आहे.

<><><><><>

केंद्रसरकारने एलटीटीई, अर्थात लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम या संघटनेवरची बंदी आणखी पाच वर्ष वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचे कर्मचारी असल्याचं भासवून खंडणी वसूल करणाऱ्यांपासून सावध राहण्याचा इशारा केंद्रीय गृहमंत्रालयानं नागरिकांना दिला आहे. ईडी, सीबीआय, पोलीस, अंमली पदार्थ विरोधी विभाग अशा संस्थांचे कर्मचारी असल्याचं भासवून सामान्य नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार होत आहेत. हे ठकसेन  निर्दोष व्यक्तींना डिजीटली ताब्यात घेतल्याचंही भासवतात.  दबाव आणून खंडणी वसूल करण्यासाठी  पोलिस स्थानक किंवा सरकारी कार्यालयाची खोटी दृश्यं उभारुन तसंच गणवेश वापरुन गुन्ह्यात अटकेची बतावणी केली जाते.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यात आज ३० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. या नक्षलवाद्यांपैकी ९ जणांवर एकूण ३६ लाखांचं बक्षीस जाहीर केलेलं होत. बिजापूर जिल्ह्यात जानेवारीपासून आजपर्यंत १८० नक्षलवाद्यांना अटक करण्यात आलं असून ७६ जणांनी आत्मसमर्पण केलं आहे.

**<><><><>**

जम्मू आणि काश्मीरमधल्या जम्मू जिल्ह्यातल्या पल्लनवाल भागातल्या नियंत्रण रेषेजवळ काल भारतीय क्षेत्रात घुसखोरी करणाऱ्या एका पाकिस्तानी नागरिकाला अटक करण्यात आलं आहे. कठुआ जिल्ह्यात संशयास्पद हालचाली करणाऱ्या ५ व्यक्ती आढळल्यानं या भागात आंतरराष्ट्रीय सीमेजवळच्या भागात मोठ्या प्रमाणावर शोध मोहीम सुरू आहे.

**<><><><>**

मुंबईत घाटकोपर परिसरात काल जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी दोषींविरोधात FIR दाखल झाला आहे. होर्डिंगच्या कंपनीचे मालक भावेश भिडे यांच्यासह कंपनीचे संचालक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याविरोधात दंड संहितेच्या विविध कलमांच्या अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून त्यांचा शोध सुरू आहे.

घाटकोपर दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा १४ वर पोहोचला असून एकूण ७५ जण जखमी झाले आहे. या ठिकाणी महानगरपालिकेची परवानगी न घेता उभारण्यात आलेल्या अन्य तीन जाहिरात फलकांना पालिकेनं काढून टाकलं.

या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या विविध शहरांमध्ये आज स्थानिक प्रशासनानं होर्डिंग्सच्या मालकांना त्याचं स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे निर्देश दिले.

**<><><><>**

'विकसित भारत २०४७ ः भारतीय बाजारपेठेसाठीचं धोरण' या विषयावर आज मुंबईत झालेल्या संवाद सत्रात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन सहभागी झाल्या

होत्या. गेल्या १० वर्षात देशातल्या वित्तीय क्षेत्रात झालेल्या बदलांचा त्यांनी आढावा **यावेळी** घेतला.

<><><><><>

प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत सहगल यांनी आज नवी दिल्लीतल्या आकाशवाणीच्या मुख्यालयाला भेट देऊन विविध विभागांच्या अधिकाऱ्यांशी कार्यप्रणाली आणि त्यासमोरची आव्हानं याबाबत चर्चा केली. आकाशवाणीच्या कार्यक्रमांची गुणवत्ता वाढवण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा त्यांनी अधोरेखित केल्या. डिजिटल माध्यमातून आकाशवाणीचे कार्यक्रम जास्तीत जास्त श्रोत्यांपर्यंत पोहचण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली.

<><><><><>

फ्रान्समध्ये आजपासून ७७ व्या कान्स चित्रपट महोत्सवाला सुरुवात झाली. द सेकंड ॲक्ट हा फ्रेंच विनोदीपट महोत्सवातला पहिला चित्रपट होता. एकूण २२ चित्रपट सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी स्पर्धा करत आहेत. याशिवाय ज्येष्ठ अभिनेत्री मेरील स्ट्रीप यांना मानद पाल्म दी ओर सन्मान देऊन गौरवलं जाणार आहे.
भारताकडून या महोत्सवात पहिल्यांदाच भारत पर्वाचं आयोजन होतंय. परदेशी तंत्रज्ञ, कलाकार, निर्माते यांच्याशी भारतीय चित्रपट उद्योगाला यामाध्यमातून चर्चा करण्याची संधी मिळेल.

<><><><><>

जालना जिल्ह्यात आज सायंकाळच्या सुमारास काही भागात वादळी वाऱ्यासह मध्यम पाऊस झाला. भोकरदन तालुक्यातल्या चिंचोली इथं वीज कोसळून मुरलीधर शेळके या शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. तर जिल्ह्यात वीज कोसळल्याच्या अन्य तीन घटनांमध्ये चार जनावरांचा मृत्यू झाल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत प्रथम फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सनं ६ षटकात १ बाद ७३ धावा केल्या होत्या. नवी दिल्लीत सुरू असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून लखनौच्या संघानं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><>//